
ISSN No.0973-2845



# समाज प्रबोधन पत्रिका

समाज प्रबोधन पत्रिका

वर्ष ६३ । अंक २५० ।
जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर २०२५

Scanned with OKEN Scanner

समाज प्रबोधन संस्थेचे प्रकाशन

# समाज प्रबोधन पत्रिका

वर्ष ६४ । अंक २५० । जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर २०२५

ISSN No. 0973 - 2845 । RNI No. : 11294/63

## अंतरंग

□ लेख

- आणीबाणीची पन्नास वर्षे / अशोक चौसाळकर / ३
- ग्राम्शीच्या मार्क्सवादातील कल्पनाप्रणाली, वर्चस्व आणि सेंद्रिय बुद्धिजीवी या संकल्पना / व्हॅलेरियनो-रॅमोस – अनुवाद : शरद नावरे / ११
- डॉ. रा. गो. भांडारकर यांचा समाजसुधारणेचा वैचारिक वारसा / अवनीश पाटील / २२
- जी. डी. बापू लाड यांची संघर्षयात्रा / जनार्दन वाघमारे / ३७
- भारत-सौदी अरेबिया या राष्ट्रांतील खनिज तेल (पेट्रोलियम ऑईल) आयात-निर्यात : वर्तमान स्थिती / मधुसूदन राजेश शिंदे / ५२
- समकालिन महाराष्ट्रातील दलित विरोधी हिंसा / विष्णु वैरागड / ५७
- कवीच्या अनुभवक्षेत्राने केवळ 'सत्य' मांडायला हवे / पी. विठ्ठल / ६४
- आदिम संस्कृतीचे कवितेत उमटलेले प्रतिबिंब / डॉ. मृदुला निळकंठ रायपुरे-जांगडेकर / ७१
- एका नक्षलवाद्याचा जन्म / भारती दिगंबर रत्नपारखी / ७६

□ श्रद्धांजली

- कॉ. व्ही. एस. अच्युतानंदन / अशोक चौसाळकर / ८२


□ पुस्तक परिचय

- नवजागरणाची संस्कृती : कर्मेन्दु शिशिर / सूर्यनारायण रणसुभे / ८५
- संस्कारक्षम चरित्र : असे होते आपले शाहू महाराज / संग्राम गोपीनाथ थोरात / ९१

Scanned with OKEN Scanner

ग्रंथ परिचय

संग्राम गोपीनाथ थोरात




# संस्कारक्षम चरित्र : असे होते आपले शाहू महाराज

**प्रस्तावना :**

आपल्या महाराष्ट्राला समाजसुधारणेचा फार मोठा इतिहास आहे. ज्ञानेश्वरादी संतांपासून, शाहू-फुले-आंबेडकरांपर्यंत तो सर्वज्ञात आहे. शिवाजी महाराजांनी घालून दिलेला सुधारणेचा पाया शाहू महाराजांनी दृढ केला. त्यामुळेच आजही त्यांच्या कार्यकर्तृत्वावर पुस्तके लिहिली जात आहेत. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील मराठी विभागाचे प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी नुकतेच 'असे होते आपले शाहू महाराज' हे शाहू महाराजांचे चरित्र लिहून शाहू महाराजांच्या कर्तृत्वाला सलाम केला आहे. विशेष म्हणजे सदर मराठी पुस्तकाचा हिंदी, इंग्रजी, कन्नड व गुजराती या चार भाषांमध्येही अनुवाद झाला आहे.

**संस्कारक्षम चरित्र : असे होते आपले शाहू महाराज :**

प्रथमतः सदर पुस्तकाचे मुखपृष्ठच वाचकांचे मन वेधून घेते. शाहू महाराजांनी वसतिगृहातील मुलांच्या अभ्यासासाठी प्रज्वलित केलेला दिवा, विद्यार्थ्यांची ज्ञानज्योत प्रज्वलित करून, त्यांचे चेहरे प्रफुल्लित करतो व त्यांना आयुष्याची प्रकाशवाट दाखवतो. अशा आशयाचे मुखपृष्ठ चितारून, चित्रकाराने शाहू महाराजांची ज्ञानाभिलाषा चित्रबद्ध केली आहे. सदर पुस्तकाचे

सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग,
किसन वीर महाविद्यालय, वाई
sangramthorat750@gmail.com
९६०४०४६०८४

मुखपृष्ठ सानेगुरुजींच्या श्यामच्या आईची आठवण करून देते. श्यामची आई ज्या वात्सल्याने मुलांवर संस्कार करते, त्याच प्रेमाने शाहू महाराजांनी बहुजन समाजातील विद्यार्थ्यांवर मायेची ज्ञानरूपी पखरण घातली आहे असे जाणवते.

सदर चरित्र एकूण चाळीस प्रकरणांमध्ये विभागले आहे. कुमारवयाच्या मुलांना डोळ्यासमोर ठेवून हे पुस्तक लिहिले असावे असे वाटते. तरीही आबालवृद्धांना ते आपलेसे वाटते. या चरित्राचे ढोबळमनाने विभागणी करायची झाल्यास; छत्रपती शिवरायांचे वारसदार, वेदोक्त प्रकरण, लोकसेवेचे व्रत, दलितोद्धारक राजा, ज्ञानोपासक राजा, कृषिवल राजा, द्रष्टे नेतृत्व, कला-कुस्ती-प्राणी प्रेमी राजा अशी करता येते.

१

राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिवरायांच्या स्वराज्याचे वारसदार होते. डॉ. मोरे यांनी अनेक प्रसंगांतून ते दाखवून देण्याचा प्रयत्न केला आहे. 'शिवछत्रपतींच्या स्वराज्याचे वारसदार' या पहिल्या प्रकरणाच्या सुरुवातीसच डॉ. मोरे म्हणतात, 'मित्रहो, भारतीय इतिहासातील एक महत्त्वाची आणि ठळक घटना म्हणजे, छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेले 'स्वराज्य' होय. स्वराज्याची स्थापना ही घटना महत्त्वाची खरी. परंतु, शिवरायांचे स्वराज्य काय होते, हेच आपण समजून घेतलेले नसते. बहुतांश लोकांना स्वराज्य म्हणजे केवळ स्वकीयांचे राज्य, इतकेच माहीत असते. तेही खरे, परंतु स्वराज्य ही त्यापेक्षा वेगळी, व्यापक आणि भव्यदिव्य गोष्ट होती. तो एक दृढविचार होता. शिवरायांची ती उदात्त अशी कांक्षा होती. सत्यात उतरलेली आदर्श राज्याबद्दलची कल्पना होती. ती समजून घेतल्याशिवाय शिवाजी महाराजांचे योगदान आपल्या लक्षात येणार नाही. स्वराज्य समजून घेतले की, आपल्याला छत्रपती शाहू महाराजही चांगले समजून घेता येतात. कारण, शिवाजी महाराजांचे शाहू केवळ रक्ताचे वारसदार नव्हते, तर विचारांचेही वारसदार होते. त्यामुळे आपले शाहू महाराज कसे होते, हे समजून घेण्यासाठी स्वराज्यातील काही गोष्टी आधी जाणून घेतल्या पाहिजेत.'' (पृ. क्र. १३) असा शिवरायांचा वारसा पुढे चालवणारे शाहू महाराज कोल्हापूरच्या गादीवर विराजमान झाले. शिवरायांचा आचार, विचार व संस्कार त्यांनी अंगीकारला होता. त्यामुळेच त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून शाहू महाराज चालत राहिले. शिवरायांशी त्यांचा अनुबंध जोडताना डॉ. मोरे यांनी कोल्हापूरच्या गादीचा इतिहास, छत्रपती संभाजी-शाहू-राजाराम महाराज व महाराणी येसुबाई आणि ताराबाई यांचेही स्वराज्यातील योगदान शब्दबद्ध केले आहे. तसेच शाहूंचा यशवंतराव घाटगे ते राजर्षी छत्रपती शाहू महाराज हा प्रवास समर्पक शब्दात मांडताना 'शाहू महाराज राजे झाले तेव्हा त्यांचे वय अवघे दहा वर्षांचे होते', हे डॉ. मोरे आवर्जून सांगतात. त्यांना राजेपद मिळाल्यानंतर त्यांचे शिक्षण सुरू झाले. स्टुअर्ट फ्रेजर त्यांना गुरू म्हणून लाभले. तत्कालीन इंग्रज सरकारच्या धोरणानुसार नव्या छत्रपतींचे शिक्षण ही इंग्रजांची जबाबदारी होती. लेखक म्हणतात, 'महाराजांचे वडील आबासाहेब विदेशात जाऊन आले होते. त्यांना तेथील संस्कृती आणि मुक्त वातावरण आपल्या मुलांसाठी योग्य वाटले नाही. परिणामी, विदेश प्रवासानंतर राजकुमारांच्या विदेशातील शिक्षणाबद्दलचे त्यांचे मत प्रतिकूल बनले. त्यामुळे इंग्रजांचा आग्रह असूनही शाहूंना विलायतेत पाठवायला त्यांनी सक्त विरोध केला. आपल्या पद्धतीने आणि नजरेसमोर आपल्या देशातच शाहूंना शिक्षण देण्याचा त्यांनी निश्चय केला. (पृ. क्र. २९) शिक्षणानंतर महाराजांनी आपला देश समजून घेतला. अलाहाबादला त्यांनी अंजिराची झाडे पहिली, दार्जिलिंगला त्यांनी चहाचे मळे पाहिले, देशाचा प्राचीन इतिहास समजून घेतला, दक्षिण भारतातील तंजावरला भेट दिली ही शिवछत्रपतींचे बंधू व्यंकोजीराजे यांची राजधानी असल्याने, त्यांच्या पुढच्या पिढीला भेटून, महाराजांना परिवारातील लोकांना भेटल्याचा आनंद मिळाला. या साऱ्या भारत भ्रमंतीतून मिळालेल्या ज्ञानाचा व अनुभवाचा उपयोग त्यांनी आपल्या राज्यउभारणीत केला. शाहू महाराजांनी राज्याची सूत्रे हाती घेतानाचे



Scanned with OKEN Scanner

त्यांचे जाहीरनाम्यातील विचार ऐकून लॉर्ड हॅरीस प्रभावित झाला. पुण्याच्या डेक्कन एज्युकेशन सोसायटीने महाराजांना दिलेल्या मानपत्रात म्हटले आहे, 'करवीर राज्य हे भारतातील या विभागातील एक प्रमुख व मानाचे राज्य म्हणून गणले गेले आहे. छत्रपतींना मराठी मुलूखाच्या नेतृत्वाचा नैसर्गिक, भावनात्मक व परंपरेने वारसा प्राप्त झालेला आहे. तेव्हा करवीर राज्याबाहेरील लोकांना मायभूमीच्या विकासाच्या कार्यात छत्रपतींकडून उत्तेजन, सहानुभूती आणि आधार मिळणे ही नैसर्गिक, भावनिक प्रक्रिया आहे.' लोकमान्य टिळकांनीही अग्रलेखाला समर्पक शीर्षक दिले, 'करवीरक्षेत्री राजकीय कपिलाषष्ठीचा योग.' (पृ. क्र. ४९) वरील शब्दातून शाहू महाराजांची महती अधोरेखित होते. पुढे शाहू महाराजांचा आणि टिळकांचा वैचारिक संघर्षही झाला पण, शाहू महाराजांचा तो वैयक्तिक स्वरूपात कधीही घेतला नाही, हा त्यांच्या मनाचा मोठेपणा होता. हा उदारपणा त्यांनी शिवरायांकडून घेतला होता.

२

'वेदोक्त प्रकरण' हा शाहू महाराजांच्या जीवनातील एक क्रांतिकारी प्रसंग आहे. डॉ. मोरे यांनी वेदोक्त प्रकरणाचा संबंध; राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना आफ्रिकेत 'तू काळा आहेस' म्हणून हिणवल्याच्या प्रसंगाशी जोडला आहे. जगातील काळा-गोरा वाद आणि आपल्याकडील अस्पृश्यता यामध्ये असणारे साम्य येथे लेखकाला दाखवून द्यायचे आहे. शाहू महाराज राजे असतानाही, त्यांच्या स्नानावेळी; नारायण भटजी शुद्रांसाठी म्हटले जाणारे पुराणोक्त मंत्र म्हणत असल्याचे; राजारामशास्त्री भागवत महाराजांच्या निदर्शनास आणून देतात तेव्हा महाराज खजील झाले, ते संत तुकारामांचे भक्त असल्याने; ते अंतर्मुख होऊन तोफखाने यांना म्हणाले, 'संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांना जेथे अपरंपार विटंबना आणि आपत्ती सोसाव्या लागल्या तेथे आपल्यासारख्या अज्ञ जनांची मातब्बरी ती काय?' (पृ. क्र. ५५) तुकाराम महाराजांचा 'जे का रंजले गांजले' हा अभंग त्यांनी आत्मसात केला आणि जनसेवेसाठी ते कटिबद्ध झाले. ब्राह्मणांचा बहुजनांकडे बघण्याचा दृष्टिकोन त्यांनी नेमका ताडला. दुःखी, कष्टी आणि शोषित लोकांच्याठायी 'देव तेथेची जाणावा'ची अनुभूती त्यांनी घेतली. यातूनच त्यांचे लोककल्याणाचे काम उभे राहू लागले. वेदोक्त प्रकरणाबाबत लेखक म्हणतात, 'वेदोक्त प्रकरण हे शाहू महाराजांनी बहुजनांच्या जीवनात सुरू केलेल्या क्रांतीचे बीज ठरले. तेथूनच कोल्हापूरच्या भूमीत क्रांतीची सुरुवात झाली. त्या क्रांतीने महाराष्ट्राला नवा चेहरा मिळाला. अनेक समाजसुधारक छत्रपती शाहू यांच्या विचार आणि कार्यातून प्रेरणा घेत राहिले. महाराष्ट्राला घडवत राहिले.' (पृ. क्र. ५७)

महाराजांच्या जीवनातील 'वेदोक्त प्रकरण' हा जणूकाही क्रांतिक्षणच होता. महाराजांची विचारधारा दृढ व पक्की होण्यासाठी हा प्रसंग कारणीभूत ठरला. आधुनिक महाराष्ट्राच्या समाजसुधारणेचे बीज या घटनेत सापडते. फुले-शाहू-आंबेडकर ही विचारधारा प्रवाहित होताना, सदर घटना विचारात घ्यावी लागते. पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना बडोदा संस्थानाचे नरेश सयाजीराव गायकवाड व कोल्हापूर संस्थानाचे छत्रपती शाहू महाराज यांची खूप मदत झाली. त्यामुळेच छत्रपती शिवरायांची बहुजन हिताची विचारधारा नव्या रूपाने महाराष्ट्राच्या समोर आली आणि आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण पक्की झाली. आज २१व्या शतकातही आपण त्याची फळे चाखतो आहोत.

३

छत्रपती शाहू महाराज लोकसेवेचे व्रत घेतलेले दलितोद्धारक राजे होते. त्यांच्या कामाची पद्धत छत्रपती शिवरायांशी मिळतीजुळती होती. 'त्यांनी काढलेली पहिली राजाज्ञा शिवाजी महाराजांच्या आज्ञापत्राची आठवण करून देणारी होती. ही राजाज्ञा रयतेच्या मालाला मिळणाऱ्या योग्य किमतीबाबत होती. हा आदेश शेतकरी आणि पारंपरिक व्यावसायिक कारागिरांच्या पिळवणुकीवर आळा घालणारा ठरला.' (पृ. क्र. ५८) त्याकाळी चालणारी वेठबिगारी; महार, मांग, रामोशी, बेरड जातीतील लोकांना गुन्हेगार ठरवून त्यांना लागू



Scanned with OKEN Scanner

केलेली हजेरीपद्धत त्यांनी बंद केली. तसेच सावकारीच्या पाशात अडकलेल्या जनतेच्या कर्जमुक्तीचा आदेशही त्यांनी काढला. पारधी, कंजारभाट, कुचकोरवी, माकडवाले, डोंबारी, कोलाटी यांच्या दुःखाच्या मुळाशी जावून, त्यांना गुन्हेगारी प्रवृत्तीपासून परावृत्त करून त्यांना स्वतःचे रक्षक, शिकारीतील सहकारी, राखणदार अशी कामे देऊन सोबत घेतले. महारोगाने त्रस्त झालेल्या कुष्ठरोग्यांसाठी त्यांनी 'महाराणी व्हिक्टोरिया कुष्ठरोगी आश्रम' नावाची संस्था स्थापन करून कुष्ठरोग्यांवर उपचार सुरू केले. तसेच त्याकाळी प्लेगच्या साथीच्या रोगाने थैमान मांडले तेव्हा महाराजांनी प्लेगच्या रुग्णांसाठी दवाखाने सुरू केले. देशातील पहिला सार्वजनिक होमिओपॅथी दवाखाना कोल्हापुरात सुरू केला. त्यांनी स्त्रियांसाठीही स्वतंत्र वैद्यकीय सेवा सुरू केली. डॉ. विश्वनाथ काटे यांना महाराजांनी वैद्यकीय सेवेसाठी मालवणहून संस्थानात आणले होते, पुढे स्वतः दाढदुखीने त्रस्त झाल्यानंतर त्यांनी डॉ. काटे यांच्या शंकर नामक मुलाला दिल्लीला डेंटिस्ट करण्यासाठी पाठविले. पण डॉ. शंकर काटे यांच्या दवाखान्यात कोणी जाईनात, तेव्हा महाराज रोज त्यांच्या दवाखान्यात जाऊन बसू लागले, तेव्हा कुठे लोकांनी तिथे जाऊन उपचार घ्यायला सुरुवात केली. अशा अनेक युक्त्या वापरून महाराजांनी रयतेला शारीरिकदृष्ट्या मजबूत बनविले. अशाप्रकारे त्यांनी रयतेची सर्वांगीण सेवा केली. 'शेतकऱ्याच्या भाजीच्या देठालाही हात लावू नका', असे मावळ्यांना ठणकावून सांगणारे छत्रपती शिवराय व 'शिपाई, शेतकरी किंवा मजूर म्हणवून घेण्याचा मला अभिमान वाटतो. राजे होण्यापूर्वी माझे वाडवडील शेतकरीच होते.' (पृ. क्र. १११) असे सांगणारे शाहू महाराज यांच्या कार्यपद्धतीत कमालीचे साम्य असल्याचे दिसून येते.

छत्रपती शाहू महाराज दलितोद्धारक राजे होते. त्यांनी संस्थानातील दवाखान्यांमध्ये अस्पृश्यांची सेवा करण्याचा आदेश काढला. नोकऱ्यांमध्ये अस्पृश्य समाजातील लोकांची भरती करून, अस्पृश्यांसाठी स्टेशन बंगल्यावर विद्यार्थीगृहे स्थापन केली. उच्च जातीतील लोकांचा विरोध पत्करून महार, मांग जातीतील लोकांना वकिलीच्या सनदा दिल्या. समाजात समानता आणण्याच्या दृष्टीने त्यांचे हे पाऊल महत्त्वपूर्ण ठरले. महार-मांग जातीतील पैलवानांशी शिवाशिव होते, म्हणून कोणी कुस्ती करत नव्हते, म्हणून महाराजांनी त्यांना सरदार, पंडित अशी नावे दिली. नागपूरच्या बहिष्कृत परिषदेत ब्राह्मण, मराठा जातीच्या पुढाऱ्यांना अस्पृश्यांच्या हातचा चहा पाजला. गंगाराम कांबळेला 'सत्यशोधक हॉटेल' सुरू करून दिले आणि स्वतः दररोज त्याच्या हातचा चहा पित असत. दलितोद्धाराची अशी अनेक कामे महाराजांनी केली. डॉ. मोरे म्हणतात, 'त्याकाळी विठ्ठल रामजी शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, बडोद्याचे सयाजी महाराज यांच्या मदतीने गंगाराम भाऊ मस्के यांच्यासारखे समाजसुधारक दलितांचे, गोरगरिबांचे जीवन सुधारण्यासाठी आणि त्यांना शिक्षण देण्यासाठी अहोरात्र धडपडत होते, अशा चांगल्या लोकांशी शाहू महाराज चर्चा करीत असत.' (पृ. क्र. ६७) तसेच त्यांना महात्मा फुले यांचे काम महत्त्वाचे वाटल्याने, फुले यांच्या मृत्यूनंतर थंडावलेले सत्यशोधक समाजाचे काम महाराजांनी हाती घेतले. या विचारांतून त्यांना प्रेरणा मिळत असे. त्यामुळेच गंगाराम कांबळेला सुरू करून दिलेल्या हॉटेलचे नाव त्यांनी सत्यशोधक हॉटेल असे ठेवले. महाराजांनी आपल्या कृतीतून अस्पृश्यता संपवण्याचा प्रयत्न केला. अशा कामांतून महाराजांच्या कृतीशील विचारांची महती पटते.

४

शाहू महाराज हे ज्ञानोपासक राजे होते. 'विद्येविना मती गेली...' या वचनाच्या माध्यमातून भारतीय लोकांना शिक्षणाचे महत्त्व सांगणाऱ्या महात्मा फुल्यांना महाराज गुरुस्थानी मानत होते. त्यांच्या मार्गावर चालताना शाहू महाराजांनी पुढे आपला स्वतंत्र हमरस्ता तयार केला. शिक्षणाचे महत्त्व त्यांनी ओळखले होते. त्यामुळेच त्यांनी आपल्या राज्यात प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. शाहू महाराज म्हणायचे, 'शिक्षणानेच आमचा तरणोपाय आहे.



Scanned with OKEN Scanner

शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची प्रगती होऊ शकत नाही, हा इतिहास आहे. अशा अज्ञानी देशात चांगल्या लढवय्या आणि वीरांचा जन्म होऊ शकत नाही. म्हणून सर्वांना सक्तीचे आणि मोफत शिक्षण दिले पाहिजे. त्याचीच देशाला गरज आहे.' (पृ. क्र. ९८) महाराजांनी देवस्थान निधीतून देवळे बांधून त्याची एक ओसरी शाळेसाठी वापरण्याचा आदेश दिला. महाराजांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन अनेकांनी पुणे, नाशिक, नागपूरपर्यंत शिक्षणकार्य सुरू केले. महाराजांचे शिष्यत्व पत्करून कर्मवीर भाऊराव पाटील हे तरुण त्यावेळी शिक्षणक्षेत्रात उतरले, त्यांनी रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून केलेले काम आज आशिया खंडात एक नंबरचे ठरले आहे. त्यांच्या कार्याचे मूल्यमापन करायचे झाल्यास महात्मा फुले–शाहू महाराज–कर्मवीर भाऊराव पाटील या मार्गाने करावे लागते.

शाहू महाराजांनी बहुजनांच्या उद्धारासाठी वसतिगृह चळवळ चालू केली. हुशार व चुणचुणीत असणाऱ्या वाडगावच्या मॅट्रिक पास झालेल्या पांडुरंग चिमणाजी पाटील या कोल्हापुरात राहाण्याची गैरसोय असणाऱ्या मुलासाठी त्यांनी 'मराठा वसतिगृह' सुरू केले. डॉ. मोरे म्हणतात, 'वसतिगृहाचे नाव 'मराठा वसतिगृह' असे असले तरी या वसतिगृहाचे प्रारंभीचे स्वरूप एकजातीय नव्हते. जातीपातींचे निर्मूलन हे शाहू महाराजांचे स्वप्न होतेच. त्यांच्या मनात सतत एकात्म समाजनिर्मितीचा ध्यास होता.' (पृ. क्र. ८९) या ध्यासातूनच पुढे महाराजांनी 'दिगंबर जैन वसतिगृह', 'इंडियन ख्रिश्चन वसतिगृह', 'इंदुमती राणीसाहेब वसतिगृह', 'देवांग वसतिगृह', 'सुतार वसतिगृह' अशा वसतिगृहांची स्थापना केल्याचे सांगताना लेखक म्हणतात, 'अशी ही महाराजांची वसतिगृह चळवळ संपूर्ण जगात शिक्षणाचे 'शाहू स्कूल' म्हणून प्रसिद्ध झाली.' (पृ. क्र. ९७) या त्यांच्या वसतिगृह चळवळीमुळेच बहुजन समाजातील मुलांना शिक्षणाची दारे खुली झाली. 'पढेगा इंडिया, तो बढेगा इंडिया' असे आज २१ व्या शतकात भारत सरकार जाहिरातीद्वारे म्हणत असले तरी, शाहू महाराजांनी शिक्षणाचे महत्त्व एकोणिसाव्या शतकातच ओळखले होते. म्हणूनच त्यांना आपण आजही द्रष्टे राजे म्हणून ओळखतो.

५

शाहू महाराज हे कृषिवल राजा व द्रष्टे नेतृत्व असणारे समाजकारणी राजे होते. त्यांनी आपला शेतकरी बाणा शेवटपर्यंत सोडला नाही. त्यांना शेती व शेतकरी यांच्याविषयी कणव होती. महाराजांचे सहकारी अण्णासाहेब लठ्ठे म्हणतात, 'महाराज गरीब लोकांशी फार मन मोकळे करून वागत. इतर कोणापेक्षा त्यांच्या सहवासात राहणे त्यांना अधिक आवडे. ते सर्वसामान्य शेतकऱ्यांसारखे साधे राहणे पसंत करीत. महाराजांना अत्यंत प्रिय असलेल्या शेतकरी पेशाच्या साधेपणाचा हा साहजिक परिणाम होता.' (पृ. क्र. १०९). युरोपच्या दौऱ्यावर जातानाही महाराजांनी क्लॉड हिल यांच्याशी केलेल्या पत्रव्यवहारात म्हटले आहे, 'आपली निवास व्यवस्था आधुनिक शेती पाहता येईल अशा ठिकाणी करा.' (पृ. क्र. १०१) यातूनच त्यांचे शेतीविषयक प्रेम दिसून येते. त्यांनी नव्या पिकांचा ध्यास घेतला होता. केळी, बुंद, वेलदोडे, तुती, चहा अशी नवी पिके घेण्याबाबत त्यांनी आदेश काढला. 'शेतकी प्रदर्शने भरवली. नव्या पिकांची, अवजारांची आणि आधुनिक पद्धतीने शेती करण्याच्या पद्धतींची शेतकऱ्यांना माहिती करून दिली. सर्वात महत्त्वाचे म्हणजे महादेव नारायण देवधर या शेतीतज्ज्ञाचे 'शेती सुधारणा' हे पुस्तक शाळेच्या अभ्यासक्रमात घेण्याबाबत त्यांनी आदेश दिला.' (पृ. क्र. ११३) शेतकरी सुखी तर राज्य सुखी असे महाराजांचे मत होते. त्यामुळेच ते महालात असताना जरी राजसिंहासनावर बसत असले तरी, शिवारात गेल्यावर थेट शेतकऱ्याच्या घोंगडीवर बसत असत.

द्रष्टे नेतृत्व हा एक महाराजांचा गुण होता. त्यांच्या द्रष्टेपणामुळेच आजही कोल्हापूर जिल्हा सुजलाम् सुफलाम् असल्याचा दिसून येतो. त्यांची प्रत्येक कृती राज्याच्या विकासाची असायची. शिक्षण, आरोग्य, व्यवसाय, शेती आणि पाणलोट क्षेत्र अशा विविध क्षेत्रांत त्यांनी



Scanned with OKEN Scanner

क्रांतिकारक निर्णय घेतले. डॉ. मोरे म्हणतात, 'त्यांनी चहाच्या मळ्याचा केलेला प्रयोग, हा महाराज काळाच्या किती पुढे पाहात होते, याचा पुरावाच आहे. राधानगरी धरण, हे कमी खर्चात जास्तीत-जास्त जमीन ओलिताखाली आणणारे धरण होते.' (पृ. क्र. ११३) तसेच लोकांनी उद्योगधंद्यात यावे म्हणून महाराजांनी प्रोत्साहन दिले, असे सांगून लेखक, शाहू महाराजांनी वसवलेली जयसिंगपूर बाजारपेठ, राधानगरी बाजारपेठ व शाहू मिल ही त्यांच्या उद्योगप्रेमाची उदाहरणे व महाराजांनी रोम शहरातील द्वंद्वयुद्धाचा भव्य आखाडा पाहून 'खासबाग मैदान' बांधले. अशी माहिती देतात. तसेच दार्जिलिंगचे चहाचे मळे पाहून; पन्हाळा परिसरात तो प्रयोग केला. अशी समर्पक उदाहरणेही देतात. महाराजांनी त्याकाळी घेतलेले निर्णय आजही कोल्हापूरसाठी क्रांतिकारी ठरल्याचे दिसून येतात.

६

कला-कुस्ती-प्राणी प्रेमी राजा म्हणूनही शाहू महाराजांची ओळख आहे. महाराजांनी आपल्या राज्यात गायन, वादन, नाटक, शाहिरी कलांना राजाश्रय दिला होता. गानमहर्षी अल्लादिया खाँ यांना गायक म्हणून दरबारात आणले. पुढे त्यांचे सारे कुटुंबच कोल्हापूरला आले. त्यामुळे जयपूर घराण्याच्या गायकीचे दर्शन कोल्हापूरकरांना झाले. त्यांच्या चिजा हुबेहूब गाणाऱ्या केसरबाईंना महाराजांनी 'तू अल्लादिया खाँ साहेबांचे गाणे अमर करशील.' असा आशीर्वाद दिला आणि पुढे केसरबाईंना भारत सरकारने 'पद्मविभूषण' या सर्वोच्च सन्मानाने गौरविले. या प्रसंगातून महाराजांची कलेची जाण अधोरेखित होते. भजन, शाहिरी या पारंपरिक कलांनाही त्यांनी पाठबळ दिले.

महाराजांनी नाट्यकलेलाही प्रोत्साहन दिले. युरोपच्या दौऱ्यात पाहिलेल्या नाट्यगृहांच्या धर्तीवर त्यांनी 'केशवराव भोसले नाट्यगृह' पूर्वाश्रमीचे (पॅलेस थिएटर) बांधले. आबालाल, रहमान, आनंदराव व बाबुराव पेंटर या चित्रकारांना महाराजांनी पाठबळ दिल्याने ते जागतिक कीर्तीचे चित्रकार झाले. यातूनच कोल्हापूरला चित्रकलेतील 'पेंटरस्कूल' तयार झाले. त्यामध्ये गणपतराव वडणगेकर, चंद्रकांत मांढरे, बाबा गजबर असे नामवंत कलावंत तयार झाले. अशी माहिती देऊन लेखक चित्रपटाविषयी लिहिताना म्हणतात, 'बाबुराव पेंटर यांनी महाराष्ट्र फिल्म कंपनी स्थापन केली. या कंपनीस मंगळवार पेठेत महाराजांनी जागा देणगी म्हणून दिली. महाराजांनी कोल्हापूरला खऱ्या अर्थाने कलापूर केले.' (पृ. क्र. १३४) असे कलाप्रेमी होते शाहू महाराज.

कलेप्रमाणेच शाहू महाराज कुस्ती व प्राणी प्रेमीही होते. त्यांना शिकारीचीही आवड होती. त्यांनी चित्ता, बहिरी ससाणा यांना हरणाची शिकार करण्याचे प्रशिक्षण दिले, तर डुकरांच्या शिकारीचे प्रशिक्षण घोड्याला दिले होते. महाराजांनी वाघ, हत्ती, घोडे, कुत्री, उंट यांना पाळले व त्यांची काळजी घेतली.

शारीरिक खेळ आणि कसरती, कुस्ती महाराजांना आवडत. त्यांनी मल्लविद्येला कलेचे स्वरूप दिले. त्यामुळे भारतात कोल्हापूरची ओळख 'मल्लविद्येचे माहेर' अशी झाली. मोतीबाग तालमीची स्थापना यातूनच झाली. साठमारीचा खेळ हीसुद्धा कोल्हापूरची वेगळी ओळख होती. माजलेल्या हत्तीला वश करण्याचा खेळ ब्रिटिशांमुळे भारतातही आला होता. महाराजांनीही 'साठमारीच्या खेळासाठी कोल्हापूर, राधानगरी, सोनतळी, पन्हाळा आणि रुकडी अशा ठिकाणी खास आखाडे बांधले. हे आखाडे अतिशय अभ्यास करून बांधण्यात आले होते. त्यादृष्टीने कोल्हापूरचा आखाडा प्रेक्षणीय होता. शिवकाळापासून महाराष्ट्रात लोकप्रिय असलेल्या अनेक मर्दानी खेळांचे पुनरुज्जीवन महाराजांनी केले. दांडपट्टा, फरिगदगा, विटा, जांबिया, बाणा असे मर्दानी खेळ त्यांनी कोल्हापूर संस्थानात लोकप्रिय केले. (पृ. क्र. १२८) अशा प्रकारे शाहू महाराजांनी मर्दानी खेळ महाराष्ट्रात रूढ केले. पंजाबच्या मल्लांकडून आपले मल्ल परास्त झाले तेव्हा महाराज इरेस पेटतात आणि आपल्या मल्लांना खास प्रशिक्षण देऊन तरबेज करतात. हे त्यांच्या कुस्तीवरील प्रेमाचे खास उदाहरण आहे.



Scanned with OKEN Scanner

**समारोप :**

अशाप्रकारे शाहू महाराजांचे उद्बोधक असे चरित्र डॉ. नंदकुमार मोरे यांनी रेखाटले आहे. पुस्तकाची सुरुवातच 'मित्रहो' या शब्दापासून झाली असल्याने, पुस्तकाला कथनाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. किशोरवयीन मुलांना डोळ्यासमोर ठेवून हे; पुस्तक लिहिले असले, तरी ते वाचताना; लेखक आपल्याला सर्वांनाच शाहू महाराजांची गोष्ट सांगत आहेत आणि आपण ती ऐकतो आहोत असे जाणवते आणि वाचक शाहूकाळात गेल्याची अनुभूती घेतो. प्रत्येक आबालवृद्ध वाचक या गोष्टीत रंगून जातो, हे लेखकाच्या लेखणीचे यश आहे. त्यामुळेच पुस्तकाची पाठराखण करताना, शिवाजी विद्यापीठातील इतिहास विभाग प्रमुख डॉ. अवनीश पाटील म्हणतात, '...हे राजर्षी शाहू महाराजांचे नावीन्यपूर्ण चरित्र वाचताना तुम्हाला महाराजांच्या काळात फेरफटका मारत आहोत, असे वाटेल.' या पुस्तकाचे शीर्षक अन्वर्थक आहे. या पुस्तकाच्या वाचनानंतर 'कसे होते आपले शाहू महाराज?' असे कोणीही विचारणार नाही; असे म्हणावेसे वाटते. कारण हे पुस्तक म्हणजे लेखक व वाचक यांच्यातील एक नितळ संवाद आहे. लेखकाची भाषा ओघवती, प्रवाह गुणाने युक्त असल्याने नितळ, सहज संवाद होतो. तसेच हे पुस्तक सचित्र रेखाटलेले असल्याने ते वाचकांच्या मनावर शाहू महाराजांचे चरित्र शब्दचित्रांच्या माध्यमातून कोरले जाते. याचे श्रेय अन्वर हुसेन या चित्राकाराला जाते. तसेच या दर्जेदार ग्रंथाची किंमत अवघी ५० रुपये आहे. त्यामुळे सामान्य माणसाच्या घरात हा ग्रंथ पोचणार आणि भावी पिढी सुसंस्कृत होणार यात तिळमात्रही शंका नाही. सर्वांनी अवश्य वाचावे असे हे संस्कारक्षम चरित्र आहे.


पुस्तकाचे नाव : असे होते आपले शाहू महाराज
लेखक : डॉ. नंदकुमार मोरे
मुद्रक : शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
पृष्ठ संख्या : १४३
मूल्य : ५०/- रुपये

◆



Scanned with OKEN Scanner

 ISSN No. 0973 - 2845 RNI No. : 11294/63




'समाज प्रबोधन पत्रिका' हे नियतकालिक श्री. सुरेश रामचंद्र शिपूरकर यांनी भारती मुद्रणालय, कोल्हापूर येथे मुद्रित केले आणि श्री. शैलेंद्र रमेश खरात यांनी समाज प्रबोधन संस्थेसाठी ४१६, आर. के. नगर हौसिंग सोसायटी नं. ६, पाचगांव, कोल्हापूर येथे प्रकाशित केले. संपादक श्री. अशोक चौसाळकर.

Scanned with OKEN Scanner